## नि.दि.दा.क्र.६३/२०१८, अर्ज निशाणी ६५ खालील आदेश
## (CNRNO.MHSI090003302018)

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादी क्र. ०१ ते ०४ यांचा जबाब वाचला. उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला. प्रतिवादींना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी सदर अर्जास आपले म्हणणे सादर केलेले नाही.

०२. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादीने प्रतिवादी क्र.०६ रेश्मा रमेश जोशी या दि.१५/०८/२०२२ रोजी मयत झाल्या असून त्यांना प्रतिवादी क्र.०७, ०८ व ०९ हेच कायदेशीर वारस आहेत व ते यापूर्वीच दाव्यात समाविष्ट असल्याने प्रतिवादी क्र.०६ यांचे नाव दाव्यातून कमी करण्याची परवानगी देऊन त्या प्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेस विनंती केली आहे.

०३. अर्ज व जबाब तसेच उभयपक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेऊन संचिकेचे अवलोकन केले असता, वादीच्या कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.०६ या दि.१५/०८/२०२२ रोजी मरण पावल्या आहेत. प्रस्तूत अर्जान्वये वादी हे प्रतिवादी क्र.०६ यांचे नाव दाव्यातून कमी करु पाहत आहेत. प्रस्तूत दाव्याचे स्वरुप लक्षात घेता व वादीच्या कथनाप्रमाणे मयताचे वारस हे पूर्वीपासून अभिलेखावर असल्याने प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता खालील आदेश.

### - आदेश -

१. नि.क्र.६५ वरील अर्ज रक्कम रु.२००/-(रुपये दोनशे फक्त) च्या खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने प्रस्तावित दुरुस्ती विहीत मुदतीत करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2023.02.15 16:15:26 +1000

स्थळ: देवगड ( एस.बी.वाळके )

दिनांकः १४/०२/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.